


**जितेंद्र म. भोळे**

**सचिव (१) (कार्यभार)**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**विधान भवन,** मुंबई ४०० ०३२/नागपूर ४४० ००१

दूरध्वनी : ०२२-२२०२ ६६ ९३, २२०२ ८२ १७

वेबसाईट : www.mls.org.in

ई-मेल : secy1-mls@mah.gov.in


क्रमांक : ००९

दिनांक : 1 DEC 2023

*सस्नेह निमंत्रण...*

प्रति,

**विधानपरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य**

**विषय : महाराष्ट्र विधानपरिषदेच्या शतकमहोत्सवानिमित्त विधानपरिषदेच्या विद्यमान सन्माननीय सदस्य तसेच नागपूर मधील ज्येष्ठ पत्रकार यांच्या उपस्थितीत नागपूर हिवाळी अधिवेशन, २०२३ निमित्त विशेष चर्चासत्र...**

**आदरणीय महोदय/महोदया,**

**सस्नेह नमस्कार,**

आपणांस विदित आहेच की, महाराष्ट्र विधानपरिषद शतक महोत्सवाचे औचित्य साधून महाराष्ट्र विधानपरिषदेच्या मा. उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या संकल्पनेनुसार विविध कार्यक्रम आणि उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. याच मालिकेत **शुक्रवार, दिनांक ८ डिसेंबर, २०२३ रोजी विधानपरिषद सभागृह, नागपूर येथे सकाळी ९.०० ते ११.०० यावेळेत** विधानपरिषदेचे विद्यमान सदस्य तसेच नागपूर विधिमंडळ अधिवेशनाचे प्रदीर्घकाळ वार्तांकन केलेले ज्येष्ठ पत्रकार यांच्या उपस्थितीत **"महाराष्ट्र विधिमंडळ संसदीय वाटचालीत हिवाळी अधिवेशनाचे महत्वपूर्ण योगदान"** या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात येत आहे. या चर्चासत्र उद्‌घाटनप्रसंगी मा. उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्यासह महाराष्ट्र राज्याचे मा.मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे, महाराष्ट्र विधानसभेचे मा. अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, मा. उप मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, मा. उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार, मा. संसदीय कार्य मंत्री श्री. चंद्रकांत (दादा) पाटील, विधानपरिषदेचे मा. विरोधी पक्षनेते श्री. अंबादास दानवे, विधानसभेचे मा. विरोधी पक्षनेते श्री. विजय वडेट्टीवार, विधानसभेचे मा. उपाध्यक्ष श्री. नरहरी झिरवाळ या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. **आपण या कार्यक्रमास अगत्यपूर्वक उपस्थित रहावे हे आग्रहाचे सस्नेह निमंत्रण.**

देशातील संसदीय लोकशाहीच्या संदर्भात द्विसभागृह व्यवस्थेत महाराष्ट्र विधानपरिषदेने उल्लेखनीय योगदान देत आपला वैशिष्ट्यपूर्ण ठसा उमटविला आहे. माँटेग्यू-चेम्सफर्ड शिफारशीनुसार भारत सरकार अधिनियम १९१९ अन्वये "Bombay Legislative Council" ची प्रारंभिक बैठक १९ फेब्रुवारी, १९२१ रोजी टाऊन हॉल मुंबई येथे झाली. श्री. नारायण गणेश चंदावरकर यांची विधानपरिषदेच्या सभापती पदी झालेली नियुक्ती ही एक ऐतिहासिक घटना होती. सन १८६२ ते सन १९२० पर्यंत Governor of Bombay यांच्या अध्यक्षतेखाली Council चे कामकाज चालत होते. सन १९२१ मध्ये श्री. नारायण चंदावरकर यांच्या रुपाने पहिल्यांदा भारतीय व्यक्तीची सभापती म्हणून नियुक्ती झाली. अत: सन १९२१ ते २०२१ हा महाराष्ट्र विधानपरिषद शतकपूर्तीचा कालखंड मानता येईल. त्यानुसार शतक महोत्सवानिमित्त विविध कार्यक्रम आणि उपक्रम आयोजित करण्यात येत आहेत.

आपण सर्व मिळून विधानपरिषद शतक महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रम यशस्वी करूया आणि या ऐतिहासिक क्षणांचे साक्षीदार होऊया...आपल्या अनुकूल प्रतिसादाच्या प्रतिक्षेत,

*आदरपूर्वक...*

आपला विश्वासू,

(स्वाक्षरी)

**( जितेंद्र भोळे )**

CamScanner